सोबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे **"महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांमध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नियुक्तीबाबत"** या विषयाचे शासन पत्र क्रमांक अपील २०१५/प्र.क्र.४१/आस्था २, दिनांक १०.७.२०१५ ची प्रत सोबत जोडत आहे.

---

**क्रमांक : १६/संकीर्ण/२०१५/शा१९०४२**
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७
मुंबई ४०० ००१.

दिनांक : 23 JUL 2015

**प्रति,**

**१) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.**

**२) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.**
**त्यांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालये प्रमुखांच्या निदर्शनास आणावे.**

( डॉ. अ.तु. पिसे )
उपसंचालक, तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठांकन क्र. विकाऔ/**माहिती अधिकार**/२०१९/ 020
दिनांक : 27 FEB 2019

प्रति,
प्राचार्य / संचालक,
शासकीय / अनुदानित / विना-अनुदानित पदविका /
पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
**औरंगाबाद विभाग**

यांना उपरोक्त प्रत्राची प्रत देऊन सुचित करण्यात येते की, पत्र क्र.अपील२०१५/प्र.क्र.४१/आस्था२ दिनांक ३०.०७.२०१५ नुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत – या कार्यालयाचे प्रोग्रॅमर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

क्रमांक : अपील २०१५/प्र.क्र.४१/आस्था २
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० जुलै, २०१५.

प्रति.

१. संचालक (उच्च शिक्षण/ तंत्र शिक्षण/व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण/कला / ग्रंथालय),
२. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे.

विषय :- महाविद्यालये / शैक्षणिक संस्थांमध्ये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नियुक्तीबाबत.

संदर्भ :- १. शासन पत्र क्र.केंमाअ २००७/प्र.क्र.३१/आस्था २, दि.९.२.२००७.
२. शासन पत्र क्र.केंमाअ २००८/प्र.क्र.१८/आस्था २, दि.२९.२.२००८.

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भाधीन पत्रांचे कृपया अवलोकन करावे.

२. दिनांक १६.५.२०१५ रोजी राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकडे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या झालेल्या आढावा बैठकीमध्ये मा.राज्य माहिती आयुक्त यांनी असे स्पष्ट केले आहे की, त्यांच्याकडे द्वितीय अपिलाच्या सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या असे निदर्शनास आणले आहे की, शासनाच्या उपरोक्त सूचनांमुळे संभ्रम निर्माण होत असून कोणत्या बाबीकरिता महाविद्यालये, शैक्षणिक संस्थेतील अधिकारी (उदा. प्राचार्य, संस्थेचे सचिव, संस्थेचे चेअरमन) जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय प्राधिकारी असतील तर कोणत्या बाबीकरिता संबंधित उपसंचालक / सहसंचालक, प्रादेशिक विभाग हे प्रथम अपिलीय प्राधिकारी असतील, हे स्पष्ट होत नसल्याने माहिती अधिकारांतर्गत प्राप्त होणारे अर्ज निकाली निघण्यास विलंब होत आहे. उपसंचालक / सहसंचालक, प्रादेशिक विभाग हे प्रथम अपिलीय प्राधिकारी असल्याने त्यांच्याकडे अपिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विचारली गेलेली माहिती ही महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांच्या स्तरावरील असल्यास माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त होणारा अर्ज महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांच्या स्तरावर अंतिम निकाली निघणे आवश्यक आहे. यासंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्पष्ट सूचना निर्गमित करण्याचे निदेश मा.राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई यांनी दिलेले आहेत. त्यानुसार पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत –

अ) महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यांच्या कार्यालयातील माहितीकरिता महाविद्यालये / शैक्षणिक संस्थामधील अधिकारी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी

१० ... आवक लिपिक तंत्र शिक्षण ...

आ ७००४२ १४/०७/१५

१६

राहतील. (उदा. प्रबंधक / अधिक्षक हे जन माहिती अधिकारी असतील तर प्राचार्य प्रथम अपिलीय प्राधिकारी राहतील)

आ) उपसंचालक / सहसंचालक, प्रादेशिक विभाग यांच्या कार्यालयातील माहितीकरिता त्या त्या कार्यालयातील अधिकारी जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी राहतील.

इ) माहितीच्या अधिकारांतर्गत प्राप्त अर्जांचा तात्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने सर्व सार्वजनिक प्राधिकरणांतर्गत कामाच्या विभाजनानुसार पुरेसे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय प्राधिकारी यांची नियुक्ती करावी व यासंदर्भातील यादी प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने प्रसिध्द करावी.

ई) माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम ४(१)(अ) मध्ये नमूद केल्यानुसार सर्व अभिलेख तालिकाबध्द व सूचीबध्द करण्यात यावेत.

उ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४(१)(ब) नुसार कार्यवाही करुन माहिती अद्ययावत करण्यात यावी.

३. आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालये / शैक्षणिक संस्था यांना त्यानुसार सूचना देव्यात.

४. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास २० दिवसांच्या कालावधीत पाठवावा, ही विनंती.

( पा. म. ताकटे )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

सर्व सह सचिव / उप सचिव/ अवर सचिव / कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.